ePaper

## पुण्यातील मंडई मेट्रो स्टेशनला भीषण आग; 6 बंब घटनास्थळी दाखल



| वर्ष - 8 | अंक -103 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 21 ऑक्टोबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- जेव्हा तुमचा खराब काळ चालू असतो
- क्रिकेटला मिळाला नवा विश्वविजेता!
- लहान बाळाचं मांस खावं लागलं!
- अधिक मुले जन्माला घाला : चंद्राबाबू

## विधानसभा निवडणूक रणधुमाळी : पिंपरी-चिंचवडमध्ये आता

# अब की बार 'महेश-शंकर' की जोडी तैयार!

## उत्सुकता शिगेला : महाविकास आघाडीची उमेदवारी कुणाला?

| पिंपरी | महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमधील महायुतीचे दोन उमेदवारांची घोषणा भारतीय जनता पार्टीकडून करण्यात आली. भोसरीतून भाजपाचे दबंग आमदार महेश लांडगे यांना, तर चिंचवडमधून पक्षाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांना संधी दिली. राजकीय युक्ती-शक्तीचा संपूर्ण संगम असलेली ही जोडी भाजपाच्या विजयाची पताका शहरात फडकावणार, असा दावा महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे.**




> उमेदवारीवरुन आमच्या कुटुंबामध्ये कसलाही वाद नव्हता. उमेदवारी दिल्याबद्दल भाजपासह महायुतीच्या सर्व घटक पक्षांच्या पक्षश्रेष्ठींचे आभार मानतो. शहरातील नागरिकांसाठी काम करणार आहे.
>
> **-शंकर जगताप,** उमेदवार, भाजपा महायुती

> पक्षश्रेष्ठींनी पहिल्या यादीत माझ्या नावाची घोषणा केली. याबद्दल पक्षश्रेष्ठींचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. 'शाश्वत विकास' हा अजेंडा घेवून आम्ही लोकांसमोर जात आहोत. या निवडणुकीत महायुतीच्या सोबतीने विजयी शंखनाद होईल, असा विश्वास आहे.
>
> **-महेश लांडगे,** आमदार, उमेदवार, भाजपा महायुती.

चिंचवडचे आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर झालेल्या पोटवनिवडणुकीत लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप यांनी विजय मिळवला होता. आज भाजपाची पहिली उमेदवारी यादी जाहीर झाली.

त्यामध्ये चिंचवडविधानसभा मतदार संघातून शहराध्यक्ष शंकर जगताप यांना निवडणूक लढण्याची संधी दिली आहे.

आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर त्यांचे बंधू शंकर जगताप हे तीव्र इच्छुक होते. मात्र, आमदारांच्या पत्नी अश्विनी जगताप यांनी या निवडणूक लढण्यावर ठाम होत्या. त्यामुळे शंकर जगताप यांनी एक पाऊल मागे घेत अश्विनी जगताप यांना संधी दिली आहे.

महेश लांडगेंना निवडणूक लढवण्याची संधी महेश लांडगे यांनी भोसरी विधानसभा मतदारसंघातून 2014 मध्ये अपक्ष म्हणून निवडणूक लढवली होती. चौरंगी लढतीमध्ये लांडगे विजयी झाले. त्यानंतर भाजप युती सरकारमध्ये भाजप संलग्न आमदार लांडगे होते. तसेच 2017 मध्ये महापालिकेच्या निवडणुकीमध्ये त्यांनी भाजपची सत्ता आणण्यासाठी प्रयत्न केले. 2019 च्या विधानसभा निवडणुकीमध्ये झालेल्या दुरंगी लढते महेश लांडगे दुसऱ्यांदा आमदार झाले. भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांच्याशी जवळीक आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड मधील अनेक प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे 2024 च्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपकडून केवळ लांडगे यांच्या नावाची चर्चा होती. अखेर त्यांना विधानसभेच्या रणधुमाळीत उतरण्याची संधी भाजपनं दिली आहे.

## विधानसभेला बारामती मतदारसंघात हाय व्होल्टेज लढत

## काका-पुतण्याच्या लढाईत कोण मारणार बाजी?

| बारामती |
महाईन्यूज | प्रतिनिधी |

बारामती विधानसभा मतदार संघात महायुतीकडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांची उमेदवारी निश्चित झाली आहे. पवार यांचा प्रचारही सुरु झाला आहे. महाविकास आघाडीकडून ही जागा राष्ट्रवादीच्या शरदचंद्र पवार गटाला जाईल. येथून अजित पवार यांचे सख्खे पुतणे युगेंद्र पवार निवडणूक लढवतील असे बोलले जात आहे. परंतु





ऐनवेळी ही लढत टाळली जाईल असे सांगितले जात आहे. बारामती विधानसभा मतदारसंघ हा पवार कुटुंबाचा बालेकिल्ला आहे. गेल्या सात निवडणुकांमध्ये येथून अजित पवार हे विजयी झाले आहेत. गत निवडणुकीत तर त्यांनी मताधिक्याचा विक्रम स्वतःच्या नावे केला. परंतु पक्ष फुटीनंतर आता परिस्थिती बदलली आहे. त्यात अजित पवार यांच्या पक्षाला येथे लोकसभेत मोठा पराभव पत्करावा लागला. सुप्रिया सुळे यांना बारामतीने ४८ हजारांचे लीड दिले. त्यामुळे अजित पवार गटाला जबर धक्का बसला. बारामती तालुक्यात मतदारांच्या भावना संमिश्र आहेत. काही मतदार लोकसभेला ताई, तर विधानसभेला दादा असे बोलत आहेत. तर शरदचंद्र पवार गटासह सामान्य व्यक्ती यंदा परिवर्तन अटळ असे सांगत आहे.

### भाजपची पहिली यादी येताच 'अकोला पॅटर्न' चर्चेत

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने आपली पहिली यादी जाहीर केली आहे. या यादीमध्ये भाजपने ९९ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. मागील निवडणुकीमध्ये तिकिट कापलं गेलेल्या चंद्रकांत बावनकुळे यांना पुन्हा एकदा उमेदवारी मिळाली आहे. या यादीमध्ये १३ महिलांचा समावेश असून काही नवीन चेहरेही पाहायला मिळाले आहेत. मात्र भाजपच्या पहिल्या यादीमध्ये अकोला पॅटर्न चर्चेत आला आहे. नेमका अकोला पॅटर्न काय आहे ते समजून घ्या. अकोला पॅटर्न म्हणचे भाजपने विद्यमान प्रतिनिधीचे तिकिट कापत त्याच्याच घरातील सदस्याला संधी दिली. अकोला लोकसभा मतदारसंघात भाजपने संजय धोत्रे यांचे तिकिट कापत त्यांचे सुपुत्र अनुप धोत्रे यांना उमेदवारी दिली होती. यंदाही भाजपने आपल्या विधानसभेच्या यादीमध्ये अकोला पॅटर्न राबवलेला दिसला. चिंचवड विधानसभा मतदारसंघातील विद्यमान आमदार अश्विनी जगताप यांचे तिकिट कापत त्यांचे दीर शंकर जगताप यांना उमेदवारी दिली आहे.

# धंगेकर यांच्या हिंदमाता प्रतिष्ठानविरुद्ध गुन्हा!

## दिवाळीनिमित्त नागरिकांना साबण, उटणे वाटप

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कसब्यातील काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांच्या हिंदमाता प्रतिष्ठानकडून दिवाळीनिमित्त साबण, उटणे वाटप करण्यात आल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे करण्यात आली. त्यानंतर रविवारी रात्री उशीरा धंगेकर यांच्या हिंदमाता प्रतिष्ठानविरुद्ध आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी समर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.**




प्रलोभन दाखविण्यात आल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे करण्यात आली. त्यानंतर रविवारी रात्री निवडणूक आयोगातील अधिकाऱ्यांनी समर्थ पोलीस ठाण्यात तक्रार दिली.दरवर्षी माझा मित्र परिवारआनंदाची दिवाळी भेट देतो. नागरिकांच्या आनंदात सहभागी होण्यासाठी हा उपक्रम राबविला जातो. आचारसंहिता लागू केल्यानंतर कुठल्याही प्रकारचे प्रलोभन किंवा वस्तुंचे वाटप करण्यावर बंधन आहे, याची जाणीव मला आहे. या उपक्रमात माझा व्यक्तिश सहभाग नाही. मला अजून उमेदवारी जाहीर झाले नाही. माझा कसब्यातून विजय पक्का असल्याने विरोधकांच्या मनात धडकी भरली आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे छायाचित्र असलेल्या पिशव्यांतून नागरिकांना दिवाळीनिमित्त वस्तूंचे वाटप सुरू आहे. माझा मित्र परिवार नागरिकांच्या आनंदात सहभागी होण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करतो. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे छायाचित्र असलेल्या पिशव्यांचे वाटप कोण रोखणार, असा प्रश्न धंगेकर यांनी उपस्थित केला आहे. माझ्यावर जर गुन्हा दाखल होऊ शकतो, तर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी धंगेकर यांनी केली

### उपक्रमात व्यक्तिश सहभाग नाही

या उपक्रमात माझा व्यक्तिश सहभाग नाही. मला अजून उमेदवारी जाहीर झाले नाही. माझा कसब्यातून विजय पक्का असल्याने विरोधकांच्या मनात धडकी भरली आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे छायाचित्र असलेल्या पिशव्यांतून नागरिकांना दिवाळीनिमित्त वस्तूंचे वाटप सुरू आहे. माझा मित्र परिवार नागरिकांच्या आनंदात सहभागी होण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करतो. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे छायाचित्र असलेल्या पिशव्यांचे वाटप कोण रोखणार, असा प्रश्न धंगेकर यांनी उपस्थित केला आहे. माझ्यावर जर गुन्हा दाखल होऊ शकतो, तर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी धंगेकर यांनी केली आहे.

आहे.निवडणूक आयोगातील अधिकाऱ्यांनी समर्थ पोलीस ठाण्यात तक्रार दिली. हिंदमाता प्रतिष्ठानकडून दिवाळीनिमित्त कसबा मतदारसंघातील नागरिकांनी दिवाळीनिमित्त सुगंधी, उटणे, उदबत्ती, रांगोळी अशा वस्तू असलेल्या पिशव्यांचे वाटप करण्यात आले. पिशवीवर धंगेकर यांच्यासह त्यांच्या पत्नीचे छायाचित्रे असून, मतदारांना प्रलोभन दाखविण्यात आल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे करण्यात आली. त्यानंतर रविवारी रात्री निवडणूक आयोगातील अधिकाऱ्यांनी समर्थ पोलीस ठाण्यात तक्रार दिली. आनंदात सहभागी होण्यासाठी हा उपक्रम राबविला जातो. आचारसंहिता लागू केल्यानंतर कुठल्याही प्रकारचे प्रलोभन किंवा वस्तुंचे वाटप करण्यावर बंधन आहे.

# विकासाच्या मुद्यावर पुन्हा एकदा विजयी होणार

## कोथरुड विधानसभा मतदार संघातून भाजपाची उमेदवारी घोषित

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने आज ९९ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. यामध्ये विद्यमान आमदारांना पुन्हा एकदा संधी दिली आहे. या यादीत कोथरूड मतदारसंघातून राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांना दुसऱ्यांदा उमेदवारी देण्यात आली आहे.**



या उमेदवारीबाबत चंद्रकांत पाटील यांनी भाजपच्या नेत्यांचे आभार मानत पुन्हा एकदा विजयी होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे.२०१९ च्या निवडणुकीत मेधा कुलकर्णी यांना डावलून चंद्रकांत पाटील यांना कोथरूड मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली होती. या निवडणुकीत त्यांनी विजय मिळवत कोथरूडमध्ये भाजपची धुरा सांभाळली. त्यांच्या कार्यकाळात मतदारसंघातील विविध विकास कामे, तरुण मुली व महिलांसाठीच्या शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांची अंमलबजावणी केली गेली आहे. भाजपाचे राज्यभरातील उमेदवार जाहीर होत असताना, कोथरूडमध्ये चंद्रकांत पाटील यांच्या उमेदवारीला स्थानिक कार्यकर्त्यांकडून जोरदार पाठिंबा मिळत असल्याचे दिसत आहे. कोथरूडमधील माझ्या प्रिय मतदार बंधू-भगिनींनो, तुमच्या प्रेम आणि विश्वासाने मला पुन्हा एकदा विधानसभा निवडणुकीत तुमचा प्रतिनिधी होण्याची संधी मिळाली आहे. या संधीसाठी मी सर्व कोथरुडकरांचे मनःपूर्वक आभार मानतो. तुमचे आशीर्वाद आणि पाठबळ हेच माझे प्रेरणास्थान आहे. पक्षश्रेष्ठींच्या विश्वासामुळे मला पुन्हा एकदा कोथरूडच्या उज्ज्वल भविष्यासाठी कार्य करण्याच्या संधीचे भाग्य लाभले आहे. मला ही संधी दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय

### कोथरुडकरांचे मन:पूर्वक आभार

या उमेदवारीबाबत चंद्रकांत पाटील यांनी भाजपच्या नेत्यांचे आभार मानत पुन्हा एकदा विजयी होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे.२०१९ च्या निवडणुकीत मेधा कुलकर्णी यांना डावलून चंद्रकांत पाटील यांना कोथरूड मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली होती. या निवडणुकीत त्यांनी विजय मिळवत कोथरूडमध्ये भाजपची धुरा सांभाळली.कोथरूडमधील माझ्या प्रिय मतदार बंधू-भगिनींनो, तुमच्या प्रेम आणि विश्वासाने मला पुन्हा एकदा विधानसभा निवडणुकीत तुमचा प्रतिनिधी होण्याची संधी मिळाली आहे. या संधीसाठी मी सर्व कोथरुडकरांचे मनःपूर्वक आभार मानतो.

गृह आणि सहकारमंत्री अमित शाह, राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी नड्डा, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रफडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कोथरूडचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांना मनःपूर्वक धन्यवाद. अशी प्रतिक्रिया चंद्रकांत पाटील यांनी दिली आहे. तसेच माझ्यावर वेळोवेळी दर्शविलेल्या विश्वासाबद्दल मी भारतीय जनता पार्टीचेही या निमित्ताने मनापासून आभार व्यक्त करतो. या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी मी अविरत प्रयत्न करेन, असे वचन देतो. असेही त्यांनी म्हटले आहे. भाजपाच्या यादीत अन्य महत्त्वाच्या मतदारसंघातील उमेदवारांची नावे देखील समाविष्ट करण्यात आली आहेत. आगामी निवडणुकीसाठी भाजपची रणनीती आणि तयारी जोरात सुरु असून, महाराष्ट्रात विकासाच्या अजेंड्यावर पक्ष भर देणार असल्याचे पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने सांगितले आहे.

# ‘न्यू पुणे’ची सीमा भिंत खचली!

## बांधकाम व्यावसायिककडून बेकायदा खोदकाम हॉटेल

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड शहरातील चिखली परिसरातील न्यू पुणे हॉटेल हे नेताजी काशीद यांच्या मालकीचे हॉटेल आहे. या हॉटेलच्या सीमा भिंतीजवळ बांधकाम व्यावसायिक सुरेंद्र अग्रवाल यांच्यावतीने बेकायदेशीर खोदकाम झाल्याने त्यांच्या या हॉटेल न्यू पुण्याची सीमा भिंत खचली आहे.**



महत्त्वाचे म्हणजे नेताजी काशीद यांच्या वतीने बांधकाम व्यावसायिक सुरेंद्र अग्रवाल यांना याबाबतची कल्पना खोदकाम करण्यापूर्वीच देण्यात आली होती. तसेच महानगरपालिकेच्या सारथी हेल्पलाइनवर सुरेंद्र अग्रवाल व ऐश्वर्यम कोर्ट यार्ड यांच्याबाबत रीतसर तक्रार केली होती.

### हॉटेल मालकाची पोलिसांत तक्रार...

याबाबत मालक नेताजी काशीद यांनी चिखली पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली. या तक्रारीत नेताजी काशीद यांनी नमूद केले की, माझ्या हॉटेल न्यू पुणे याची सीमा भिंत खचली आहे तसेच साईड मार्जिन होता व वस्तु ढासळल्याने हॉटेलला धोका पोहोचला असून गंभीर अपघात होण्याची दाट शक्यता त्यामुळे निर्माण झाली आहे. तरी सदर दोन्ही बांधकाम व्यावसायिक व आर्किटेक्चर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्यांचे हे बेकायचा बांधकाम बंद करावे व झालेल्या नुकसानीची भरपाई करून द्यावी, अशी मागणी हॉटेल मालक नेताजी काशीद यांनी केली आहे.

मनपा बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने 28 जून रोजी याबाबत अगरवाल यांना नोटीस बजावली होती व न्यू पुणे हॉटेलच्या सीमा भिंतीस धोका असल्याबाबत कळविले होते.

परंतु, सदर बांधकाम व्यावसायिक व आर्किटेक्चर विलास अचलकर, अशोक माने आणि सुरेंद्र अग्रवाल यांनी याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले व बेकायदा खोदकाम सुरूच ठेवले.

त्यामुळे नेताजी काशीद यांच्या हॉटेल न्यू पुणेचे मोठे नुकसान झाले आहे.

# पिंपरी-चिंचवडला प्रखर हिंदुत्ववादी विकासाभिमूख नेता लाभला!

## राष्ट्रीय प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचे गौरवोद्गार

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी : पिंपरी-चिंचवड शहराला आमदार महेश लांडगे यांच्या रूपाने प्रखर हिंदुत्ववादी नेता मिळाला आहे. खरे तर आपल्यासाठी ही मोठी भाग्याची गोष्ट आहे. आमदार लांडगे हे हिंदुत्वाचा प्रचार आणि प्रसार करीत असले, तरी सर्व समाज घटकांना एकत्र करून त्यांच्या सोबतीने शहरासाठी धडाडीने काम करत आहेत. त्यांच्या कामाचा धडाका पाहता शहर विकासाला चालना देऊन आमदार लांडगे शहराला नव्या उंचीवर नेतील, अशी मला खात्री आहे अशा भावना सप्तखंजिरीच्या माध्यमातून ग्रामस्वच्छतेचा संदेश देणारे श्री गुरुदेव सेवा मंडळाचे ज्येष्ठ प्रचारक तथा राष्ट्रीय प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांनी व्यक्त केल्या.**






भोसरी येथील कै. अंकुशराव लांडगे सभागृहात आमदार महेशद लांडगे यांच्या उपस्थितीत विदर्भ समाज मेळावा पार पडला. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विदर्भातील व्यक्तींना विदर्भ समाज भूषण पुरस्कार देऊन (दि.17) गौरविण्यात आले. सप्त खंजिरी वादक सत्यपाल महाराज यांचा समाज प्रबोधन कीर्तनाचा कार्यक्रम हजारो विदर्भवासीयांच्या उपस्थितीमध्ये मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाला विदर्भ मित्र मंडळ माजी अध्यक्ष हरिभाऊ तांदळे, स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विनायकराव भोंगाळे, भाजपा महिला चिटणीस कविता भोंगाळे, मंडल अध्यक्ष, रवींद्र नांदुरकर, कामगार नेते सचिन लांडगे, उद्योजक कार्तिक लांडगे, माजी नगरसेवक विकास डोळस, सागर गवळी, पुणे जिल्हा नियोजन समिती सदस्य विजय फुगे, सामाजिक कार्यकर्ते कुलदीप परांडे, योगेश लोंढे आदी उपस्थित होते.

सत्यपाल महाराज म्हणाले की, अनिष्ट रूढी परंपरांच्या मुळावर घाव घालण्याचे काम मी करीत आलो. शिक्षणाची कास धरा आणि समाजाची प्रगती करा असा संदेश मी दिला.

### विदर्भवासियांची आमदार लांडगे यांना साथ..

विदर्भातील समाज बांधवांनी एकी दाखवत आगामी विधानसभा निवडणुकीत आमदार महेश लांडगे यांना पुन्हा प्रचंड मताधिक्याने निवडून आणायचा निर्धार केला. पिंपरी-चिंचवड शहर आणि औद्योगिक पट्ट्यात विदर्भातून नोकरी-व्यावसायाच्या निमित्ताने स्थायिक झालेल्या नागरिकांची संख्या मोठी आहे. सर्वसमाज घटकांना सोबत घेवून जाणारे आमदार लांडगे यांच्या पाठीशी ठामपणे राहू, असा संकल्प या मेळाव्यात करण्यात आला.

शहर विकासाला चालना देताना आमदार लांडगे यांनी प्रखर हिंदुत्वाची कास सोडलेली नाही.ही गोष्ट माझ्या दृष्टीने फार मोठी आहे. हिंदुत्वाचा प्रचार करताना सर्व समाज घटकांना एकत्र ठेवणे सोपे नाही. मात्र, आमदार लांडगे यांनी हे शिवधनुष्य पेलले आहे.

# निमूटपणे ऐका... भागवतच बोलताहेत!



## भूमिका

**मोहन भागवत यांना कधी काय बोलावे याची विलक्षण समज आहे. ते जाहीररीत्या बोलतात कमी, पण बोलण्यासाठी दिवस- प्रसंग निवडण्याचे चातुर्य त्यांच्याकडे भरपूर. त्यांच्या भाषणातले शब्दही अगदी चपखल असतात (अर्थात ते हिंदी शब्द मी इंग्रजी भाषांतरातूनच वाचू शकतो.**

माझ्यासह अनेक जण भागवतांच्या विचारांशी अजिबात सहमत नसले तरीही त्यांची भाषणे विशेषत: २०१४ नंतर लक्षणीय आणि महत्त्वाचीही ठरताहेत, हे कुणालाही नाकारता येणार नाही.भागवत यांचा शब्द हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अधिकृत वक्तव्य मानले जाते. केवळ ते सरसंघचालक आहेत म्हणून नव्हे, तर रा. स्व. संघाची संघटनात्मक रचनाही याला कारणीभूत आहे. ही संघटना एकचालकानुवर्ती, म्हणजे प्रमुखपदाला अनन्य महत्त्व. त्यामुळे भागवतांची भाषणे गांभीर्याने ऐकली जातच होती, पण अलीकडच्या काळात हे गांभीर्य वाढले आहे. लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर ‘अहंकार न बाळगता, मर्यादा पाळून काम करा’ हा नागपूरच्या संघ कार्यकर्ता शिबिरात त्यांनी केलेल्या भाषणातील महत्त्वाचा संदेश होता. ते आणखी काय म्हणाले पाहा :या निवडणुकीच्या प्रचारात ज्या प्रकारे असत्य आणि शिवराळ भाषा वापरली गेली, त्याने राजकीय



पक्षांच्या आजवरच्या सभ्यतेचे सारे संकेत मोडले. दोन्ही बाजूंनी ज्या प्रकारे आपला पट्टा घट्ट करून हल्ले केले आहेत, त्यामुळे फूट पडेल, सामाजिक आणि मानसिक दरी वाढेल. (२) राजकीय स्पर्धक हे विरोधक नसतात. ते तुमच्यापेक्षा निराळा दृष्टिकोन मांडत असतात. विपक्षाला ‘विरोधी पक्ष’ न म्हणता ‘प्रतिपक्ष’ म्हणून, त्यांचा दृष्टिकोनही समजून घेणे हे लोकशाहीचे लक्षण. (३) जो आपले कर्तव्य बजावताना मर्यादा पाळतो, ज्याला आपल्या कार्याचा अभिमान असूनही ‘मी’पणापासून अलिप्त राहतो, जो अहंकाररहित असतो – अशी व्यक्ती खरोखरच सेवक म्हणण्यास पात्र आहे.‘मोदींना देण्यात आलेल्या कानपिचक्या’ याच अर्थाने भागवत यांच्या या तिन्ही मुद्द्यांची चर्चा झाली, हे वेगळे सांगणे न लगे. भागवतांनी यानंतरचे भाषण लगेच जुलैमध्ये केले. “काही लोक आधी सुपरमॅन (महापुरुष), त्यानंतर पूजनीय आणि नंतर देव बनू पाहत आहेत’’, असे झारखंडमधील गुमला येथे भागवत म्हणाले. मोदी यांनी निवडणुकीपूर्वीच एका मुलाखतीत, आपला जन्म जैविक प्रक्रियेने झालेला नसल्याचे विधान केले होते(!) आणि त्यामुळे मोदी हे स्वत:ला ईश्वरी अंश वा अवतार समजत असल्याची चर्चा सुरू झाली होती; या पार्श्वभूमीवर भागवतांनी मोदींना मर्यादेची जाणीव या भाषणातून करून दिली, असेच मानले गेले.तिसरे भाषण विजयादशमीचे म्हणजे रा. स्व. संघाच्या स्थापना दिन सोहळ्यातले. यंदा संघ १०० व्या वर्षात पदार्पण करत असल्याने परवाच्या १२ ऑक्टोबर रोजी झालेल्या या भाषणाचे महत्त्व अधिक. या भाषणात भागवत यांनी संघाच्या पूर्वापार विचारधारेचाच पुनरुच्चार करण्यावर भर दिल्याचे दिसले. या भाषणात धर्म, संस्कृती, व्यक्तिगत आणि राष्ट्रीय चारित्र्य, सुष्टशक्तींचा वा न्यायाचा/ धर्माचा विजय, स्वाभिमान अशा शब्दांची रेलचेल होती. हमास आणि इस्रायलमधील संहारक संघर्षाचा उल्लेख या भाषणात असला तरी ४३ हजार बळींच्या आकड्याकडे निर्देश नव्हता; जम्मू-काश्मीरमधील निवडणूक निकालाचा उल्लेख असला तरी तेथील नव्या सरकारला शुभेच्छा नव्हत्या; मणिपूरचा उल्लेख केवळ ‘संपूर्ण पूर्वांचल (भारताच्या ईशान्येकडील राज्यांचा समूह) अस्वस्थ आहे’ इतपतच होता. या भाषणातील बाकीचा सारा भाग हा मात्र मोदींकडून अनेकदा ऐकलेल्या भाषणांसारखाच होता. देशाला अस्थिर करण्याच्या प्रयत्नांना बळ मिळते आहे, उदारमतवादी म्हणवणारे (पाश्चात्त्य) देश अन्य देशांमध्ये लोकशाही मार्गाने आलेली सरकारे उलथून लावण्यासाठी कोणताही बेकायदा किंवा हिंसाचारी मार्ग वापरण्याच्या थराला जाऊ शकतात. भारताची प्रतिमा मलिन करण्यासाठी असत्यांचा आणि अपप्रचाराचा आधार काही जण घेत आहे... वगैरे अत्यंत गंभीर आरोप करणारी विधानेही होती. या आरोपांच्या पुष्ट्यर्थ काही पुरावे आहेत की नाही, याचे दुरान्वयानेही सूचन भागवतांच्या भाषणात नव्हते. बांगलादेशाबद्दलही अशीच विधाने करताना तर भागवतांची रसवंती बहरास आल्याचे दिसले.

## प्रासंगिक »

### करिता सायास...

***मनमोहन सिंग सरकारातील दूरसंचारमंत्री ए. राजा हे त्यातील मुख्य आरोपी.***

हा ‘घोटाळा’ (?) कसा झाला हे आठवणे आता मनोरंजक ठरेल. याचे कारण दूरसंचारातील ज्या निर्णयांमुळे भ्रष्टाचार झाला असे तत्कालीन विरोधी पक्ष भाजपस त्या वेळी वाटले तोच मार्ग सत्ताधारी असलेल्या भाजपने दूरसंचारासाठी आत्ता निवडलेला असून त्या वेळी ज्या मार्गास खासगी कंपन्यांचा विरोध होता तोच मार्ग आता खासगी कंपन्यांस हवाहवासा वाटू लागला आहे. दूरसंचार क्षेत्रातील या बदलत्या कंपनलहरी समजून घेणे आवश्यक. त्यांचा लिलाव केला नाही. तो केला असता तर केंद्र सरकारच्या तिजोरीत एक लाख ७६ हजार कोटी रुपये जमा झाले असते, ते बुडाले; म्हणून दूरसंचाराचा राजा-निर्णय हा ‘एक लाख ७६ हजार कोटी रुपयांचा घोटाळा’ असे तर्कट तत्कालीन महालेखापाल विनोद राय यांनी लावले आणि विरोधी पक्षीय भाजप, माध्यमे यांनी तेच तुणतुणे वाजवायला सुरुवात केल्याने घोटाळ्याचा आरोप सिंग सरकारला चिकटला.

वसाहतवाद्यांनी स्वत:च्या फायद्यासाठी कायदे केले, आर्थिक विकासाला पूरक ठरणाऱ्या रेल्वे आदी यंत्रणा उभारल्या, काही देशांत गुलामीची, बांधील मजुरांची प्रथाही रुजवली... अशा संमिश्र आर्थिक इतिहासाचे ओझे नव-स्वतंत्र देशांवर पडले... त्याच्या अभ्यासासाठी यंदा अर्थशास्त्रातील ‘नोबेल’ मिळालेल्या तिघांच्या कामाची ही ओळख...

# विकास आणि विषमतेच्या इतिहासातून भविष्याकडे...

अर्थशास्त्रातील नोबेल स्मृती पुरस्कार मिळवण्याची अमेरिकनांची मक्तेदारी या वर्षीदेखील कायम राहिली. यंदाचा- २०२४ सालचा नोबेल स्मृती गौरव पुरस्कार हा डेरेल असिमोग्लू, सायमन जॉन्सन आणि जेम्स रोबिन्सन या तीन अमेरिकन अर्थतज्ज्ञांना नुकताच जाहीर झाला. यापैकी डेरेल असिमोग्लू आणि सायमन जॉन्सन हे अमेरिकेतील एमआयटी या संस्थेत प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत, तर जेम्स रोबिन्सन हे शिकागो विद्यापीठात कार्यरत आहेत. ‘आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत राजकीय आणि सामाजिक संस्थांचा सहभाग आणि भूमिका’ या क्षेत्रात मूलभूत संशोधन करून त्याचा ऐतिहासिक दृष्टीने अभ्यास जगासमोर मांडण्याचे काम या अर्थतज्ज्ञांनी केल्याचे नोबेल स्मृती पुरस्कार निवड समितीने नमूद केले आहे. विविध देशांच्या प्रगतीमधील वैधर्म्य किंवा तफावत आणि त्याची कारणे तपासून त्याबद्दलची आपली समज वाढवण्याचे काम या तीन अर्थतज्ज्ञांनी केले, असे



निरीक्षण या समितीने मांडले आहे. या त्रोटक परिचयातून सामान्यजनांना, आर्थिक विषयांत रस असलेल्यांना या तिघांचे काम नेमके कळणे कठीण; ते उलगडून सांगण्यासाठी हा लेखनप्रपंच. कुठल्याही देशाचा आर्थिक विकास होत असताना विविध प्रकारच्या सामाजिक आणि राजकीय संस्था महत्त्वाची भूमिका बजावतात. ‘ज्या देशांमध्ये कायद्याची बाजू कमकुवत असते आणि सामाजिक संस्था या समाजाचे शोषण करतात त्या देशांची प्रगती खुंटते’ असे निरीक्षण या अर्थतज्ज्ञांच्या अभ्यासातून समोर आले आहे. या तीनही अर्थतज्ज्ञांच्या संयुक्त अभ्यासातून अर्थशास्त्राच्या अध्ययनाची आणि संशोधनाची ऐतिहासिक पद्धत आणि संस्थात्मक अर्थशास्त्राच्या (इन्स्टिट्यूशनल इकॉनॉमिक्स) तत्त्वांना बरोबर घेऊन या दोन्हींची सांगड घालण्याचे एक नवे तंत्र विकसित होताना दिसत आहे. गेल्या वर्षी नोबेल स्मृती पुरस्कार मिळवणाऱ्या अमेरिकन अर्थतज्ज्ञ क्लॉडिया गोल्डीन यांनीदेखील संशोधनाची ऐतिहासिक पद्धत वापरून ‘श्रम बाजारामध्ये स्त्रियांचा सहभाग’ या विषयावर संशोधन केले होते. या वर्षीच्या नोबेल स्मृती पुरस्काराचे वैशिष्ट्य म्हणजे ज्या अर्थतज्ज्ञांना हा पुरस्कार विभागून दिला आहे त्यांनी त्यांचे संशोधन वसाहतवादाच्या कालखंडापर्यंत मागे नेले असून वसाहतवादाचा काळ (साधारण सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून १९५०/६० पर्यंत) औद्योगिक क्रांतीचा कालखंड लक्षात घेता वसाहतवादी युरोपीय देशांनी त्यांच्या वसाहती जगाच्या अनेक भागात स्थापन केल्यानंतर त्या त्या भागात अस्तित्वात असणाऱ्या सामाजिक संस्था आणि समाजरचना विकासाच्या दृष्टीने कशा बदलत गेल्या याचा चिकित्सक अभ्यास केला आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# 50 हजार खर्चून मतदान वळवा!

## वंचितचे प्रमुख आंबेडकर यांचा अधिकाऱ्यांना सल्ला

।नवी दिल्ली।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

सर्वोच्च न्यायालयाने दोन महिन्यांपूर्वी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या आरक्षणात काही जातींना वेगळे आरक्षण देण्यासाठी वर्गीकरण करता येईल, असा निकाल दिला. या निकालाच्या विरोधात देशभरातल्या अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या संघटनांनी एकत्र येत २१ ऑगस्ट रोजी 'भारत बंद'चे आंदोलन पुकारले होते. अनुसूचित जाती आणि जमातीच्या आरक्षणाला संविधानाच्या नवव्या परिशिष्टात टाकावे, जेणेकरून भविष्यात पुन्हा कधीही त्याला न्यायालयात आव्हान देता येणार नाही, अशी मागणीही त्या भारत बंद आंदोलनाद्वारे करण्यात आली होती. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण आणि क्रिमी लेअरचा निर्णय लागू करण्याच्या दृष्टीने पावलं टाकण्यास सुरुवात केली आहे.

दरम्यान, वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी देखील केंद्र सरकारच्या धोरणास विरोध दर्शवला आहे. आंबेडकर यांनी काही वेळापूर्वी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की "केंद्राच्या या धोरणाला आपण निवडणुकीतून विरोध केला पाहिजे. याला आपण निवडणुकीचा मुद्दा बनवलं पाहिजे". तसेच आंबेडकरांनी सर्व सनदी व शासकीय अधिकाऱ्यांना याविरोधात एकत्र येण्याचं व निवडणुकीतील मतदान आपल्याकडे वळवण्यासाठी काम करण्याचं आवाहन केलं आहे. प्रकाश आंबेडकरांनी अधिकाऱ्यांना सल्ला दिला आहे की त्यांनी स्वतःचे ५० हजार रुपये खर्च करा आणि मतदान आपल्या बाजूला वळवा.प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं आहे की सुप्रीम कोर्टाने एससी, एसटी आरक्षणाचे उपवर्गीकरण आणि क्रिमी लेअर हा निर्णय लागू करण्यासाठी एका निवृत्त न्यायाधीशाची नेमणूक केली आहे. बार्टीच्या एका अधिकाऱ्याला सचिव म्हणून नेमण्यात आले आहे, त्यांचा अहवाल हा सादर केला जाईल अहवाल एकदा सादर झाला की



सुप्रीम कोर्टाचा उपवर्गीकरण आणि क्रिमी लेअरचा निर्णय लागू होईल.वंचितचे प्रमुख म्हणाले, हा निर्णय लागू झाला तर एससी एसटी त्या अधिकाऱ्यांच्या मुलाला मुलीला आणि कुटुंबाला आरक्षण मिळणार नाही. हे त्यांनी समजून घ्यावे आरक्षण वाचवणे हा निवडणुकीचा मुद्दा आपण केला पाहिजे, म्हणून या सर्व अधिकाऱ्यांना माझी विनंती आहे की त्यांनी स्वतःचे ५० हजार रुपये खर्च केले पाहिजेत. निवडणुकीत प्रचार करण्यासाठी किंवा मतदान आपल्याकडे वळवण्यासाठी कशा पद्धतीने वळवायचं याची आपल्याला अधिक जाणीव आहे. उद्याचे आमदार निवडून आले तर हा निर्णय अंमलबजावणी करण्यापासून थांबवता येतो. म्हणून तमाम फुले शाहू आंबेडकवादी विचाराच्या अधिकाऱ्यांना आवाहन करतोय की आपण या निवडणुकीमध्ये आपल्या पदरचे पन्नास हजार रुपये खर्च करून आपल्या मुलाबाळांचं आरक्षण वाचवा असे आवाहन मी करत आहे. वंचित बहुजन आघाडीला मतदान देऊन हे आरक्षण आपण वाचवाल ही अपेक्षा.वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी देखील केंद्र सरकारच्या धोरणास विरोध दर्शवला आहे. आंबेडकर यांनी काही वेळापूर्वी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की "केंद्राच्या या धोरणाला आपण निवडणुकीतून विरोध केला पाहिजे. याला आपण निवडणुकीचा मुद्दा बनवलं पाहिजे". तसेच आंबेडकरांनी सर्व सनदी व शासकीय अधिकाऱ्यांना याविरोधात एकत्र येण्याचं व निवडणुकीतील मतदान आपल्याकडे वळवण्यासाठी काम करण्याचं आवाहन केलं आहे. प्रकाश आंबेडकरांनी अधिकाऱ्यांना सल्ला दिला आहे की त्यांनी स्वतःचे ५० हजार रुपये खर्च करा आणि मतदान आपल्या बाजूला वळवा.प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं आहे की सुप्रीम कोर्टाने एससी, एसटी आरक्षणाचे उपवर्गीकरण आणि क्रिमी लेअर हा निर्णय लागू करण्यासाठी एका निवृत्त न्यायाधीशाची नेमणूक केली आहे. बार्टीच्या एका अधिकाऱ्याला सचिव म्हणून नेमण्यात आले आहे, त्यांचा अहवाल हा सादर केला जाईल अहवाल एकदा सादर झाला की सुप्रीम कोर्टाचा उपवर्गीकरण आणि क्रिमी लेअरचा निर्णय लागू होईल.वंचितचे प्रमुख म्हणाले, हा निर्णय लागू झाला तर एससी एसटी त्या अधिकाऱ्यांच्या मुलाला मुलीला आणि कुटुंबाला आरक्षण मिळणार नाही. हे त्यांनी समजून घ्यावे आरक्षण वाचवणे हा निवडणुकीचा मुद्दा आपण केला पाहिजे.

### मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर पोस्ट

हजार रुपये खर्च केले पाहिजेत. निवडणुकीत प्रचार करण्यासाठी किंवा मतदान आपल्याकडे वळवण्यासाठी कशा पद्धतीने वळवायचं याची आपल्याला अधिक जाणीव आहे. ल केंद्र सरकारच्या धोरणास विरोध दर्शवला आहे. आंबेडकर यांनी काही वेळापूर्वी एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की "केंद्राच्या या धोरणाला आपण निवडणुकीतून विरोध केला पाहिजे. याला आपण निवडणुकीचा मुद्दा बनवलं पाहिजे". तसेच आंबेडकरांनी सर्व सनदी व शासकीय अधिकाऱ्यांना याविरोधात एकत्र येण्याचं व निवडणुकीतील मतदान आपल्याकडे वळवण्यासाठी काम करण्याचं आवाहन केलं आहे.

# ज्योती मेटे यांचा शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश

## राष्ट्रवादीत बीडमधून ज्योती मेटे यांना उमेदवारी देण्यात येणार

।अमरावती।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्यापासून राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडींना वेग आला आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये बैठकांचा धडाका सुरु आहे. दुसरीकडे भारतीय जनता पक्षाने आज ९९ उमेदवारांची पहिली यादी आज जाहीर केली आहे. तसेच महाविकास आघाडीच्या उमेदवारांची यादीही लवकरच जाहीर करण्यात येईल, असं महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून सांगण्यात येत आहे.



अशातच अनेक नेते एका पक्षातून दुसऱ्या पक्षात प्रवेश करत असल्याचंही पाहायला मिळत आहे.आज शिवसंग्राम पक्षाच्या नेत्या ज्योती मेटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून बीडमधून ज्योती मेटे यांना उमेदवारी देण्यात येणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. आज शरद पवार, सुप्रिया सुळे, जयंत पाटील यांच्या उपस्थितीत ज्योती मेटे यांचा पक्ष प्रवेश पार पडला आहे.

या पक्ष प्रवेशानंतर ज्योती मेटे यांनी प्रतिक्रिया देताना उमेदवारीसंदर्भात सूचक भाष्य केलं आहे.

"राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश करत असताना विधानसभा निवडणुकीचेच कारण आहे. आमची शिवसंग्राम संघटना समाजकारण करते. राजकारणाची जोड देऊन पुढे जाण्यासाठी हा पक्ष प्रवेश केला आहे. बीड विधानसभा मतदारसंघासाठी आम्ही आमचा प्रस्ताव मांडलेला आहे.

### संघटनेची धुरा कोण सांभाळणार?

आमची यासंदर्भात चर्चा झालेली आहे. त्यामुळे आम्ही हा निर्णय घेतला. त्यामुळे आम्ही पक्षाने सांगितलेली सर्व जबाबदारी योग्य पद्धतीने पार पडणार आहोत", अशी प्रतिक्रिया ज्योती मेटे यांनी पक्ष प्रवेश केल्यानंतर दिली.ज्योती मेटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षात प्रवेश केल्यानंतर शिवसंग्राम संघटनेची धुरा कोण सांभाळणार? असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला असता ज्योती मेटे म्हणाल्या, आपल्या सर्वांना आठवत असेल की विनायक मेटे यांच्या निधनानंतर झालेल्या आमसभेत माझी एकमताने अध्यक्षपदी निवड करण्यात आली होती.

# लहान बाळाचं मांस खावं लागलं!

## इसिसच्या महिलेनं सांगितला धक्कादायक अनुभव

**| नवी दिल्ली |**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**इस्रायलने हमासचा खात्मा करण्यासाठी वर्षभराहून अधिक काळापासून गाझापट्टीवर हल्ले केले आहेत. नुकतेच इस्रायलच्या सैन्याने गाझामधून याझिदी समुदायाच्या फौझिया अमीन सिडो या मुलीची सुटका केली होती. सुटकेच्या दोन आठवड्यानंतर आता या मुलीने तिच्यावर झालेल्या अत्याचाराचा पाढा वाचला आहे. अवघ्या दहा वर्षांची असताना सिडो आणि तिच्या भावाचे अपहरण करण्यात आले होते. तीन दिवस उपाशीपोटी पायपीट केल्यानंतर अपहरण केलेल्या जमावाला इसिसच्या अतिरेक्यांनी खायला अन्न दिलं. यामध्ये भात आणि मांसाचा समावेश होता. हे मांस याझिदी समुदायाच्या मुलांचं होतं, हे नंतर सर्वांना उमगलं.**





फौझिया सिडोनं जेरुसलेम पोस्टशी बोलताना तिच्याबरोबर झालेल्या अत्याचाराची माहिती दिली. ती म्हणाली, त्यांनी आम्हाला भात आणि मांस खायला दिलं होतं. पण त्याची विचित्र वाटत होती. आमच्यातील काही जणांना नंतर पोटदुखी सुरू झाली तर काहींनी उलट्या केल्या. जेव्हा आमचं जेवून झालं, तेव्हा अतिरेक्यांनीच सांगितलं की ते मांस याझिदी समुदायातील मुलाचं होतं. त्यांनी आम्हाला शिरच्छेद केलेल्या मुलांचे फोटोही दाखवले आणि सांगितलं की, या मुलांना तुम्ही आताच खाल्लं.फौझिया सिडो पुढं म्हणाली की, हे ऐकून आमच्यातल्या एका महिलेला हदयविकाराचा झटका आला आणि ती तिथेच मरण पावली. तसेच एका महिलेने त्या फोटोंमधून स्वतःच्या मुलाला ओळखलं आणि हंबरडा फोडला. इसिसच्या अतिरेक्यांनी आमच्यावर खूप दबाव टाकला होता. त्यामुळे आम्हाला काही सुचत नव्हतं. आमच्या हाती काहीच नव्हतं.२०१४ साली इस्लामिक स्टेट अर्थात इसिसनं इराकमधील आणि सीरियामधील याझिदींविरुद्ध क्रूर मोहीम सुरू केली.

अनेक मुली आणि महिलांना त्यांनी गुलाम बनवलं. प्राचीन यझिदी समुदाय अल्पसंख्याक असून इसिसने त्यांच्यावर अनन्वित अत्याचार केले.फौझिया सिडो आता २१ वर्षांची झाली आहे. दहा वर्षांची असताना जेव्हा तिचे अपहरण झाले त्यानंतर तिला नऊ महिने जमिनीखाली असलेल्या कारागृहात कोंडून ठेवण्यात आलं होतं. तिच्याबरोबर आणखी २०० याझिदी महिला आणि मुलं होती. काही मुलं पाण्याच्या कमतरतेमुळं तिथेच मरण पावली. सिडोला आतापर्यंत अनेकदा जिहादी अतिरेक्यांना विकण्यात आलं. त्यापैकीच एक अबू अमर अल-मकदीसी आहे, ज्याच्यापासून सिडोला दोन मुलं झाली. ११ वर्ष कैदेत राहिल्यानंतर इस्रायल, अमेरिका आणि इराक यांचा समावेश असलेल्या संयुक्त मोहिमेद्वारे सिडोची सुटका करण्यात आली. आता ती इराकमध्ये तिच्या कुटुंबियांबरोबर आहे. सिडोची दोन्ही मुले मात्र गाझामध्येच आहेत. तिथे अपहरणकर्त्यांनी त्यांना ताब्यात ठेवले आहे. त्यांना ते अरब मुस्लीम म्हणून वाढविणार आहेत. सिडोनं सांगितलं की, मला गाझामधील 'सबाया'मध्ये ठेवण्यात आलं होतं. हा एक अरेबिक शब्द आहे. जिथे तरूण मुलींचं लैंगिक शोषण केलं जातं.फौझिया सिडो पुढं म्हणाली की, हे ऐकून आमच्यातल्या एका महिलेला हृदयविकाराचा झटका आला आणि ती तिथेच मरण पावली. तसेच एका महिलेने त्या फोटोंमधून स्वतःच्या मुलाला ओळखलं आणि हंबरडा फोडला. इसिसच्या अतिरेक्यांनी आमच्यावर खूप दबाव टाकला होता. त्यामुळे आम्हाला काही सुचत नव्हतं. आमच्या हाती काहीच नव्हतं.२०१४ साली इस्लामिक स्टेट अर्थात इसिसनं इराकमधील आणि सीरियामधील याझिदींविरुद्ध क्रूर मोहीम सुरू केली. अनेक मुली आणि महिलांना त्यांनी गुलाम बनवलं. प्राचीन यझिदी समुदाय अल्पसंख्याक असून इसिसने त्यांच्यावर अनन्वित अत्याचार केले.फौझिया सिडो आता २१ वर्षांची झाली आहे.

### गाझापट्टीवर हल्ले केले

तिला नऊ महिने जमिनीखाली असलेल्या कारागृहात कोंडून ठेवण्यात आलं होतं. तिच्याबरोबर आणखी २०० याझिदी महिला आणि मुलं होती. काही मुलं पाण्याच्या कमतरतेमुळं तिथेच मरण पावली. सिडोला आतापर्यंत अनेकदा जिहादी अतिरेक्यांना विकण्यात आलं. त्यापैकीच एक अबू अमर अल-मकदीसी आहे, ज्याच्यापासून सिडोला दोन मुलं झाली. ११ वर्ष कैदेत राहिल्यानंतर इस्रायल, अमेरिका आणि इराक यांचा समावेश असलेल्या संयुक्त मोहिमेद्वारे सिडोची सुटका करण्यात आली. इस्रायलने हमासचा खात्मा करण्यासाठी वर्षभराहून अधिक काळापासून गाझापट्टीवर हल्ले केले आहेत. नुकतेच इस्रायलच्या सैन्याने गाझामधून याझिदी समुदायाच्या फौझिया अमीन सिडो या मुलीची सुटका केली होती.

# अधिक मुले जन्माला घाला : मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू

## वृद्धांच्या वाढत्या लोकसंख्येवर चंद्राबाबू नायडू यांनी व्यक्त केली चिंता

**| नवी दिल्ली |**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी एका कार्यक्रमात बोलताना राज्यातील वृद्धांची वाढती लोकसंख्या लक्षात घेता जोडप्यांना अधिक मुले जन्माला घालण्याचा सल्ला दिला आहे. तसेच चंद्राबाबू नायडू यांनी यावेळी वृद्धांच्या वाढत्या संख्येवर चिंता व्यक्त करत वृद्धांची संख्या वाढण्याचा धोकाही नमूद केला.**

मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी विशेषतः दक्षिणेकडील राज्यामधील कुटुंबांना अधिक मुले जन्माला घालण्याचे आवाहन केले आहे.मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी म्हटलं की, "लोकसंख्या घटणे आणि तरुणांचे स्थलांतर राज्यासाठी धोकादायक ठरू शकते. लोकसंख्या व्यवस्थापन अंतर्गत कायदा आणण्याचाही विचार सुरु असून यामध्ये मोठ्या कुटुंबांना प्रोत्साहन देण्याचा विचार आहे. अधिक मुले असलेल्या कुटुंबांना आम्ही प्रोत्साहन देण्याचा विचार करत आहोत. जोडप्यांना अधिक मुले जन्माला घालण्यासाठी प्रोत्साहित करत आहोत. दोनपेक्षा जास्त अपत्ये असलेल्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवण्यास प्रतिबंध करणारा पूर्वीचा कायदा आम्ही रद्द केला आहे. दोनपेक्षा जास्त मुले असलेल्या लोकांनाच स्थानिक



स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढवता याव्यात, यासाठी सरकार कायदा आणण्याचा विचार करत आहे", असं चंद्राबाबू नायडू यांनी म्हटलं. यासंदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.दरम्यान, मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी असंही सांगितलं की, "कुटुंबांना प्रोत्साहन देऊन लोकसंख्येच्या असमतोलाची समस्या सोडवता येऊ शकते. अधिक मुले असलेल्या कुटुंबांना लाभ देण्याची तयारी सरकार करत आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमधील खेडे गावांमध्ये केवळ वृद्ध लोक आहेत. कारण तरुण पिढी देशाच्या विविध भागात आणि परदेशात स्थलांतरित झाले आहेत.

सरकार विचार करत असलेल्या कायद्यामुळे मोठ्या कुटुंबांना निवडणूक लढवण्याची संधी मिळेल. तसेच त्यामुळे लोकसंख्या वाढीस चालना मिळेल." चंद्राबाबू नायडू यांनी पुढे म्हटलं की, "राज्यातील प्रजनन दर १.६ वर आला आहे. जो राष्ट्रीय सरासरी २.१ पेक्षा खूपच कमी आहे. ही परिस्थिती दक्षिणेकडील राज्यांना वृद्ध लोकसंख्येच्या समस्येत ढकलू शकते.

### लोकसंख्या बदलांवरही भाष्य केलं

आंध्र प्रदेशला जपान आणि युरोपसारख्या परिस्थितीला सामोरे जावं लागेल", अशी चिंता चंद्राबाबू नायडू यांनी व्यक्त केली. चंद्राबाबू नायडू यांनी २०१८ मध्येही अशाच प्रकारचं आवाहन केलं होतं. त्यानंतर त्यांनी राज्यातील वृद्ध लोकसंख्येच्या समस्येबद्दल चेतावणी दिली होती आणि कुटुंबांना अधिक मुले जन्माला घालण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी सुचवलं होतं. त्यांनी आंध्र प्रदेशातील लोकसंख्येतील घट आणि तेलंगणाच्या निर्मितीनंतर झालेल्या लोकसंख्या बदलांवरही भाष्य केलं होतं.

# दीपिका -रणवीर सिंहने दिली गुडन्यूज

अभिनेत्री दीपिका पदुकोण व रणवीर सिंह बॉलीवूडमधील लोकप्रिय कपल आहे. ऑनस्क्रीनबरोबरच ऑफस्क्रीन केमिस्ट्रीमुळे दोघे नेहमीच चर्चेत असतात. आदर्श जोडी म्हणून दोघांकडे बघितले जाते. दीपिका व रणवीर सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात सक्रिय असतात. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करत ते चाहत्यांना अपडेट देत असतात. आता दीपिकाने तिच्या चाहत्यांना एक गुडन्यूज दिली आहे. दीपिका व रणवीर लवकरच आई-बाबा होणार आहेत. दीपिकाने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत ही गुडन्यूज दिली आहे. दीपिकाने इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये तिने 'सप्टेंबर २०२४' असे लिहिले आहे व खाली तिचे व रणवीरचे नाव लिहिले आहे. तसेच या पोस्टमध्ये लहान बाळाचे कपडे व खेळण्यांचे चित्रही रेखाटले आहे. दीपिकाची ही पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली आहे. या गुडन्यूजनंतर चाहत्यांबरोबरच बॉलीवूडमधील अनेक मंडळी तिचे अभिनंदन करताना दिसत आहेत.'गोलियों की रासलीला राम-लीला' या चित्रपटापासून रणवीर व दीपिकाची लव्हस्टोरी सुरू झाली. या चित्रपटात दोघांनी पहिल्यांदा एकत्र काम केले होते. त्यानंतर दोघे 'बाजीराव-मस्तानी' आणि 'पद्मावत' या चित्रपटात एकत्र झळकले. सहा वर्ष एकमेकांना डेट केल्यानंतर रणवीर व दीपिकाने १४ नोव्हेंबर २०१८ रोजी लग्नगाठ बांधली. इटलीमध्ये दोघांच्या शाही लग्नसोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. २०१५ मध्ये रणवीर आणि दीपिकाने गुपचूप साखरपुडाही केला होता.

# ट्रोल करणाऱ्यांवर जया बच्चन भडकल्या

अभिनेत्री जया बच्चन यांना त्यांच्या अभिनयाबरोबर रागीट स्वभावासाठीही ओळखले जाते. त्या सातत्याने चिडचिड करताना, पापाराझींवर भडकतानाचे व्हिडीओ व्हायरल होत असतात. त्यांचे फोटो घेणाऱ्या, त्यांच्याबरोबर फोटो काढू इच्छिणाऱ्या चाहत्यांना अनेकदा त्या फटकारताना दिसतात. दरम्यान, एका कार्यक्रमात जया बच्चन यांनी पुन्हा एकदा ट्रोल करणाऱ्यांवर निशाणा साधला आहे.अमिताभ व जया बच्चन यांच्याप्रमाणे त्यांची नात नव्या नवेली नंदाही नेहमीच चर्चेत असते. नव्याचा चाहतावर्गही मोठा आहे. नव्या अभिनय क्षेत्रापासून लांब असली तरी सोशल मीडियावर ती मोठ्या प्रमाणात सक्रिय असते. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करीत ती चाहत्यांना अपडेट देत असते. आता नव्या एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे. नुकताच तिचा पॉडकास्ट शो 'व्हॉट द हेल नव्या'चा दुसरा सीझन प्रदर्शित झाला. या कार्यक्रमात नव्याची आजी म्हणजे अभिनेत्री जया बच्चन व आई श्वेता नंदा यांनी हजेरी लावली होती. दरम्यान, या कार्यक्रमामध्ये जया बच्चन यांनी आपल्या वैयक्तिक आयुष्याबाबत अनेक खुलासे केले आहेत. या पॉडकास्टमध्ये नव्याने जया बच्चन यांना विचारले, "सोशल मीडियावर नकारात्मक कमेंट्सवर लोकांच्या सर्वांत जास्त प्रतिक्रिया येतात. त्यावर तुमचं काय म्हणणं आहे?" या प्रश्नाला उत्तर देताना त्या म्हणाल्या, "जर तुम्हाला कमेंट करायची असेल, तर सकारात्मक करा.

# केतकी चितळे कोण आहे?

अ‍ॅट्रॉसिटी कायद्या विषयी आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या अभिनेत्री केतकी चितळे (KETAKI CHITALE) आणि संयोजक बाजीराव धर्माधिकारी यांच्या विरोधात परळी शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला आहे. 5 फेब्रुवारी रोजी परळीत राज्यस्तरीय ब्राह्मण ऐक्य परिषद संपन्न झाली होती .या परिषदेत बोलताना केतकी चितळे हिने अ‍ॅट्रॉसिटी विषयी आक्षेपार्ह वक्तव्य केलं होतं. परळीतील परळी शहर पोलीस तसेच उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देऊन हा गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली होती. अखेर चार दिवसानंतर वंचित युवा बहुजन आघाडीचे शहर अध्यक्ष प्रेम जगतकर यांच्या फिर्यादीवरून ब्राह्मण ऐक्य परिषदेचे संयोजक बाजीराव धर्माधिकारी आणि केतकी चितळेच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यांच्या विरोधात विरोधात कलम 295 (अ) तसेच कलम 505 (2) अन्वये हा गुन्हा दाखल करण्यात आलाय. केतकीच्या या वक्तव्यामुळे सध्या राज्यभरातून रोष व्यक्त केला जात असल्याचं पाहायला मिळतंय. त्यामुळे आता केतकीवर काय कारवाई केली जाईल हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. केतकी चितळे म्हणाली,"गेल्या पाच वर्षात किती अ‍ॅट्रॉसिटी केस आहेत. त्यातल्या ब्राह्मणांच्या विरोधात किती आहेत आणि प्रत्येक जातीविरोधात किती आहेत हे शोधा. हे अख्ख रॅकेट आहे. ज्याबद्दल तुम्हाला कल्पनाही नाही. एक वकीलांनी गेल्या 15-20 वर्षात 62 अ‍ॅट्रॉसिटी केसेस टाकल्या आहेत.



# चित्रपटसृष्टीने अनेकदा अपमानित केले

चित्रपटसृष्टीतील अनेकांनी आपल्याला अपमानित केले, मात्र सूड उगवण्याचा आपला स्वभाव नाही. तसेच, आपल्याला अपमानित करणाऱ्यांविरुद्ध दावे दाखल करण्यापेक्षा आपला बचाव करण्यावर आपण लक्ष केंद्रित केले, असा दावा अभिनेत्री कंगना राणावत हिने अंधेरी येथील दंडाधिकारी न्यायालयात केला. अभिनेता सुशांत सिंह राजपूतच्या मृत्यूनंतर एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत खोटी विधाने केल्याच्या आरोपाप्रकरणी ज्येष्ठ गीतकार जावेद अख्तर यांनी कंगनाविरोधात मानहानीचा फौजदारी दावा दाखल केला आहे. याप्रकरणी, अंधेरी येथील दंडाधिकारी न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान कंगना हिने आपली बाजू मांडली. बाहेरचा माणूस म्हणून आपल्याला चित्रपटसृष्टीतील छळवणुकीला सामोरे जावे लागत असल्याचे सुशांत याने म्हटले होते. आपलीही चित्रपटसृष्टीकडून छळवणूक झाल्याची तक्रार मी केली होती. आपल्यालाही सिनेसृष्टीबाहेरील व्यक्ती म्हणून हिणवल्याचेही कंगनाने आपले म्हणणे मांडताना साक्ष न्यायालयाला सांगितले. चित्रपटसृष्टीतील या छळवणुकीला कंटाळून आत्महत्येचा विचार एका क्षणी आपल्याही मनात आला होता. त्यामुळे, सुशांत याच्या आत्महत्येची बातमी ऐकल्यानंतर खूप वाईट वाटल्याचेही कंगना हिने सांगितले.मुलाखतीत, अख्तर वगळता इतर कोणाबददलही आपण बोललो नाही. मुलाखतीत हेतुत: आपण त्यांच्या नावाचा उल्लेख केला होता. मुलाखतीमध्ये बोलण्यामागचा हेतू हा चित्रपटसृष्टीबाहेरच्या लोकांसमोरील आव्हाने सर्वसामान्यांसमोर आणण्याचा आपला उद्देश होता. आपण अभिनेता हृतिक रोशनची माफी मागण्यास नकार दिल्याने २०१६ च्या बैठकीत अख्तर हे आपल्याला ओरडले होते. अख्तर यांच्या वागण्यामुळे आपण नैराश्यात गेलो होतो. आपण या सगळ्या प्रकाराला घाबरल्यामुळेच आपल्याविरोधात तक्रार दाखल झाल्याचेही कंगना हिने सांगितले.अपमानित केले, मात्र सूड घेण्याचा आपला स्वभाव नाही आणि म्हणूनच अख्तर यांच्याविरोधात तक्रार दाखल करण्यास उशीर झाल्याचे कंगना हिने न्यायालयाला सांगितले.

# आलियाने सिद्धांत चतुर्वेदीला केला मेसेज

बॉलीवूड अभिनेता सिद्धांत चतुर्वेदीने 'गली बॉय' चित्रपटातून हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण केलं. ११ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रदर्शित झालेल्या 'गहराइयां' चित्रपटामुळे सिद्धांत चर्चेत आला. बॉलीवूडमधील स्ट्रगल कोणालाच सुटत नाही, असं म्हणतात. सिद्धांतलाही बॉलीवूडमधील आव्हानांना सामोरं जावं लागलं होतं. या कठीण काळात सिद्धांतला काही कलाकारांकडून पाठिंबाही मिळाला होता. अलीकडेच याबाबत त्यानं खुलासा केला आहे.'हिंदुस्थान टाइम्स'ला दिलेल्या मुलाखतीत सिद्धांत म्हणाला, "मी इंडस्ट्रीमधील कोणत्याही व्यक्तीकडून अपेक्षा ठेवत नाही. चांगलं काम केल्यावर मिळत असलेल्या पाठिंब्याचं मी कौतुक करतो परंतु कठीण काळात इंडस्ट्रीमधलं कोणीही जवळ नसल्याची खंत मला वाटते."कलाकारांच्या पाठिंब्याबद्दल बोलताना, सिद्धांत म्हणाला, "विकी कौशल आणि रणबीर कपूरने मला खूप मदत केली आहे. रणबीर कपूर आणि मी फोनवर खूप वेळा बोललोसुद्धा आहे."पुढे सिद्धांत म्हणाला, "मी रणबीरला म्हणालो होतो, "मला माहीत नाही भाई; पण मी केलेलं काम चालतच नाही आहे." त्यावर रणबीर म्हणाला होता, "तू काम करत राहा. इतर लोक १०० गोष्टी करीत आहेत याचा विचार तू करू नकोस." आणि असाच रणबीर आहे. असं मला वाटतं. शंभर ठिकाणी नसूनही तो प्रसिद्ध आहे. 'गहराइयां' चित्रपट फ्लॉप झाल्यानंतर रणबीर आणि आलिया हे दोघंच असे होते: ज्यांनी मला मोठमोठे मेसेज केले होते.""रणबीर म्हणाला होता, "जेव्हा तू चित्रपट चालण्याची अपेक्षा सोडशील तेव्हा तुझा चित्रपट चालेल." 'खो गये हम कहां' हा चित्रपट फक्त नेमक्या प्रेक्षकांसाठी बनवला गेला होता. पण त्याला लोक एवढं प्रेम देतील, असं मला वाटलं नव्हत", असंही सिद्धांतनं नमूद केलं. दरम्यान, सिद्धांतच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर २०२३ रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेल्या 'खो गये हम कहां' चित्रपटात सिद्धांतबरोबर अनन्या पांडे आणि आदर्श गौरवनं मुख्य भूमिका केल्या होत्या. 'गली बॉय' चित्रपटामुळे सिद्धांत घराघरांत पोहोचला. सिद्धांतचा आगामी चित्रपट 'युद्धा' लवकरच प्रदर्शित होणार असून, त्यात मालविका मोहनम नायिकेच्या भूमिकेत दिसणार आहे.बॉलीवूड अभिनेता सिद्धांत चतुर्वेदीने 'गली बॉय' चित्रपटातून हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण केलं. ११ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रदर्शित झालेल्या 'गहराइयां' चित्रपटामुळे सिद्धांत चर्चेत आला. बॉलीवूडमधील स्ट्रगल कोणालाच सुटत नाही, असं म्हणतात. सिद्धांतलाही बॉलीवूडमधील आव्हानांना सामोरं जावं लागलं होतं. या कठीण काळात सिद्धांतला काही कलाकारांकडून पाठिंबाही मिळाला होता.



# क्रिकेटला मिळाला नवा विश्वविजेता!

## न्यूझीलंडने द.आफ्रिकेवर मात करत पटकावलं पहिलं जेतेपद

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२४ च्या फायनल सामन्यात न्यूजीलंडने दक्षिण आफ्रिकेवर ३२ धावांनी मात करत प्रथमच जेतेपद पटकावले. त्याचबरोबर क्रिकेट जगताला टी-२० विश्वचषकाचा नवा विजेता मिळाला आहे. या सामन्यात न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना ५ बाद १५८ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिका संघाला निर्धारित २० षटकात ९ बाद १२६ धावाच करता आल्या. त्यामुळे दक्षिण आफ्रिका संघ पुन्हा एकदा 'चोकर्स' ठरला आहे.**




न्यूझीलंडची ही तिसरी विश्वचषक फायनल होती. आता २० ऑक्टोबर हा दिवस न्यूझीलंड क्रिकेट संघासाठी ऐतिहासिक ठरला आहे. त्यांनी २४ वर्षांनंतर विश्वचषक जिंकला आहे. याआधी न्यूझीलंड संघाने २००० साली महिला वनडे विश्वचषक जिंकला होता. मात्र, महिला टी-२० विश्वचषकावर पहिल्यांदाच नाव कोरले आहे. तसेच यंदाही दक्षिण आफ्रिका संघ 'चोकर्स'चा शिक्का पुसण्यात अपयशी ठरला आहे. कारण या संघाचा सलग दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषकाच्या फायनलमध्ये पराभव झाला. दक्षिण आफ्रिकेच्या क्रिकेटसाठी हा निराशाजनक क्षण आहे. या सामन्यातील पराभवानंतर त्यांचा संघ खूपच निराश दिसत होता. दक्षिण आफ्रिकेचा महिला संघ सलग दुसरा टी-२० विश्वचषक फायनल खेळत होता. यासोबतच त्यांचा संघ दुसऱ्या अंतिम फेरीतही पराभूत झाला. गेल्या फायनलमध्ये त्यांचा ऑस्ट्रेलियन महिला संघाकडून पराभव झाला होता, तर यावेळी त्यांना न्यूझीलंडच्या महिला संघाकडून पराभव पत्करावा लागला आहे. दरम्यान, पुरुषांच्या टी-२० विश्वचषकाचा अंतिम सामनाही जून २०२४ मध्ये खेळवण्यात आला होता. जिथे त्यांच्या पुरुष संघाचाही भारतीय संघाने अंतिम फेरीत ७ धावांनी पराभव केला होता. एकंदरीत, दक्षिण आफ्रिकेने गेल्या एका वर्षात तीन टी-२० विश्वचषक फायनल गमावल्या आहेत.दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यातील महिला टी-२० विश्वचषक २०२४ च्या विजेतेपदाचा सामना दुबईतील दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय आफ्रिकेसाठी मोठी चूक ठरला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या न्यूझीलंडने २० षटकांत १५८/५ धावा केल्या. अमेलिया केरने न्यूझीलंडसाठी सर्वात मोठी खेळी खेळली, तिने ३८ चेंडूत ४ चौकारांच्या मदतीने ४३ धावा केल्या.१५९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा संघ न्यूझीलंडच्या गोलंदाजांसमोर सपशेल अपयशी ठरला. सलामीला आलेल्या कर्णधार लॉरा वोल्वार्ड आणि ताजमीन ब्रिट्स यांनी संघाला चांगली सुरुवात करून दिली. दोघींनी पहिल्या विकेटसाठी ५१ धावा (४१ चेंडू) जोडल्या. ही अप्रतिम भागीदारी सातव्या षटकात संपुष्टात आली, जेव्हा ताजमीन ब्रिट्स १८ चेंडूत १ चौकाराच्या मदतीने १७ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. या पहिल्या विकेटनंतर आफ्रिकन संघ सावरू शकला नाही. कर्णधार लॉरा वोल्वार्ड २७ चेंडूत ५चौकारांच्या मदतीने ३३ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. येथून संघाने सातत्याने विकेट्स गमावल्या. ज्यामुळे त्यांना दुसऱ्या टी-२० विश्वचषकाच्या फायनलमध्ये पराभव पत्करावा लागला.न्यूझीलंडची ही तिसरी विश्वचषक फायनल होती. आता २० ऑक्टोबर हा दिवस न्यूझीलंड क्रिकेट संघासाठी ऐतिहासिक ठरला आहे. त्यांनी २४ वर्षांनंतर विश्वचषक जिंकला आहे. याआधी न्यूझीलंड संघाने २००० साली महिला वनडे विश्वचषक जिंकला होता. मात्र, महिला टी-२० विश्वचषकावर पहिल्यांदाच नाव कोरले आहे. तसेच यंदाही दक्षिण आफ्रिका संघ 'चोकर्स'चा शिक्का पुसण्यात अपयशी ठरला आहे. कारण या संघाचा सलग दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषकाच्या फायनलमध्ये पराभव झाला. दक्षिण आफ्रिकेच्या क्रिकेटसाठी हा निराशाजनक क्षण आहे. या सामन्यातील पराभवानंतर त्यांचा संघ खूपच निराश दिसत होता. दक्षिण आफ्रिकेचा महिला संघ सलग दुसरा टी-२० विश्वचषक फायनल खेळत होता. यासोबतच त्यांचा संघ दुसऱ्या अंतिम फेरीतही पराभूत झाला. गेल्या फायनलमध्ये त्यांचा ऑस्ट्रेलियन महिला संघाकडून पराभव झाला होता, तर यावेळी त्यांना न्यूझीलंडच्या महिला संघाकडून पराभव पत्करावा लागला आहे.

### आफ्रिकेसाठी मोठी चूक

पुरुषांच्या टी-२० विश्वचषकाचा अंतिम सामनाही जून २०२४ मध्ये खेळवण्यात आला होता. जिथे त्यांच्या पुरुष संघाचाही भारतीय संघाने अंतिम फेरीत ७ धावांनी पराभव केला होता. एकंदरीत, दक्षिण आफ्रिकेने गेल्या एका वर्षात तीन टी-२० विश्वचषक फायनल गमावल्या आहेत.दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यातील महिला टी-२० विश्वचषक २०२४ च्या विजेतेपदाचा सामना दुबईतील दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय आफ्रिकेसाठी मोठी चूक ठरला.

# जेव्हा तुमचा खराब काळ चालू असतो

## वीरेंद्र सेहवागने बाबर आझमला दिला महत्त्वाचा सल्ला

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बाबर आझम दीर्घकाळापासून खराब फॉर्मशी झुंजत आहे. बाबरची बॅट तिन्ही फॉरमॅटमध्ये शांत दिसत आहे. सध्या पाकिस्तान संघ इंग्लंडविरुद्ध तीन सामन्यांची कसोटी मालिका खेळत आहे. मालिकेतील पहिल्या सामन्यात बाबर पाकिस्तानचा भाग होता, पण संघाचा पराभव आणि बाबरच्या खराब फॉर्ममुळे त्याला मालिकेतील उर्वरित दोन कसोटी सामन्यांमधून वगळण्यात आले.**






आता पाकिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज शोएब अख्तरने भारताचा माजी फलंदाज वीरेंद्र सेहवागला विचारले की बाबरने या खराब काळातून सावरण्यासाठी काय करावे? यावर सेहवाग काय म्हणाला जाणून घेऊया. शोएबने त्याच्या यूट्यूब चॅनेलवर सेहवागला विचारले की, "बाबर आझमने बॅटिंगमध्ये काय चूक करत आहे? त्यावर सेहवागने उत्तर दिले की, "जेव्हा फलंदाजाचा खराब काळ चालू असतो, तेव्हा त्याची मानसिकता बिघडते. ज्यामुळे त्याचे शॉट सिलेक्शन चुकते. बाबर आझममध्येही मला तेच दिसते. तो संघाचा कर्णधार होता. आता तो कर्णधारपदावरून पायउतार झाला आहे. त्याच्याकडून पूर्वी ज्या अपेक्षा होत्या, त्या आता कमी होत आहेत. त्यामुळे अशा परिस्थितीत त्याच्या टेक्निकपेक्षा मानसिकेतेवर जास्त परिणाम झाला आहे. त्याला मानसिकदृष्ट्या खंबीर होऊन पुनरागमन करावे लागेल. तो एक चांगला खेळाडू आहे.जे चांगले खेळाडू आहेत, ते लवकर पुनरागमन करतात. बाबर आझम पाकिस्तान संघात परत येईल आणि चांगली कामगिरी करेल अशी आशा आहे. कधी कधी एखाद्या मोठ्या खेळाडूला एखाद्या सामन्यासाठी किंवा मालिकेसाठी वगळले जाते.

### बाबर आझमची आंतरराष्ट्रीय कारकीर्द

तेव्हा तो पूर्वीपेक्षा अधिक कणखर होऊन पुनरागमन करतो." यानंतर वीरेंद्र सेहवाग सल्ला देताना म्हणाला, "बाबर आझमने काही काळ क्रिकेटपासून दूर राहावे आणि त्याच्या फिटनेसवर लक्ष केंद्रित करावे. त्याचबरोबर कुटुंबासोबत वेळ घालवावा. बाबर आझमने पाकिस्तानसाठी आतापर्यंत ५५ कसोटी, ११७ एकदिवसीय आणि १२३ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. त्याने कसोटीच्या १०० डावात ३९९७ धावा केल्या आहेत.